# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेत वित्त विभागांतर्गत लेखापरिक्षण **{सामान्य प्रशासन विभाग}** विभागाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य लक्षात घेता विभागाचे सबलीकरण करून अनुषंगीक लेखापरिक्षण विषयक काम पार पाडण्यास्तव इत्यादी विवक्षित कामेकरिता जाहिरात क्र. 185/पी.आर./दि. 15.06.2023 च्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करण्यात आलेल्या विवक्षित कामाच्या अनुषंगाने अनुक्रमे 1) श्री. संजय आंबुलकर, "कंत्राटी लेखापरिक्षक" 2) श्री. मनोहर दुरबळे, "कंत्राटी लेखापरिच्छेद समन्वयक" यांना करार पद्धतीवर महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम 53(3) मधील तरतुदीनुसार, करार पध्दतीने प्रथमत: 6 महिन्याकरीता, शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक तत्वावर, कार्यालयीन आदेश क्र. 75(A), 75(B)/ओ.ॲण्ड.एम./दि. 03/07/2023 अन्वये "कंत्राटी लेखापरिक्षक" व "कंत्राटी लेखापरिच्छेद समन्वयक" म्हणून नियुक्ती करण्यात आलेले आहे. त्यानंतर मनपा प्रशासक ठराव क्र. 710 दिनांक 17/01/2024 नुसार कार्यालयीन आदेश क्र. 75(A)/75(B)/ओ.ॲण्ड एम./दि. 18/01/2024 या आदेशान्वये त्यांचा नियुक्ती कालावधी दि. 03.07.2024 रोजी संपुष्टात आल्यामुळे दोन "कंत्राटी लेखापरिक्षक" व "कंत्राटी लेखापरिच्छेद समन्वयक" म्हणून श्री. संजय आंबुलकर, श्री. मनोहर दुरबळे, त्यांच्या सेवेची वित्त विभागाला आवश्यकता असल्यामुळे, तांत्रिक खंड देऊन दि. 05.07.2024 पासून पुढील 6 महिन्याकरिता (दि. 04.01.2025 पर्यंत) मुदतवाढ देण्याचा व याकरिता अंदाजे रु. 6,63,000/- इतका खर्च येणार असून प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी.
टिप:- सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 858/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 11/06/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेत वित्त विभागांतर्गत लेखापरिक्षण विभागाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य लक्षात घेता विभागाचे सबलीकरण करून अनुषंगीक लेखापरिक्षण विषयक काम पार पाडण्यास्तव इत्यादी विवक्षित कामेकरिता जाहिरात क्र. 185/पी.आर./दि. 15.06.2023 च्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करण्यात आलेल्या विवक्षित कामाच्या अनुषंगाने अनुक्रमे 1) श्री. संजय आंबुलकर, "कंत्राटी लेखापरिक्षक" 2) श्री. मनोहर दुरबळे, "कंत्राटी लेखापरिच्छेद समन्वयक" यांना करार पद्धतीवर महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम 53(3) मधील तरतुदीनुसार, करार पध्दतीने प्रथमत: 6 महिन्याकरीता, शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक तत्वावर, कार्यालयीन आदेश क्र. 75(A), 75(B)/ओ.ॲण्ड.एम./दि. 03/07/2023 अन्वये "कंत्राटी लेखापरिक्षक" व "कंत्राटी लेखापरिच्छेद समन्वयक" म्हणून नियुक्ती करण्यात आलेले आहे. त्यानंतर मनपा प्रशासक ठराव क्र. 710 दिनांक 17/01/2024 नुसार कार्यालयीन आदेश क्र. 75(A)/75(B)/ओ.ॲण्ड एम./दि. 18/01/2024 या आदेशान्वये त्यांचा नियुक्ती कालावधी दि. 03.07.2024 रोजी संपुष्टात आल्यामुळे दोन "कंत्राटी लेखापरिक्षक" व "कंत्राटी लेखापरिच्छेद

समन्वयक" म्हणून श्री. संजय आंबुलकर, श्री. मनोहर दुरबळे, त्यांच्या सेवेची वित्त विभागाला आवश्यकता असल्यामुळे, तांत्रिक खंड देऊन दि. 05.07.2024 पासून पुढील 6 महिन्याकरिता (दि. 04.01.2025 पर्यंत) मुदतवाढ देण्याचा व याकरिता अंदाजे रु. 6,63,000/- इतका खर्च येणार असून प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.